सोबत, तंत्रशिक्षण उपविभागाची विविध कार्यालये/शासकीय संस्था/शासन स्थापित स्वायत्त संस्था तसेच अधिनियमाव्दारे स्थापित मंडळे/प्राधिकरणे यांनी खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीच्या सुधारित नियमांचे पालन करण्याबाबत या विषयीचे **महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक : तंशिख-१८१७/(प्र.क्र.२१/२०१७)/तांशि-३ मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दि. ०१ फेब्रुवारी, २०१७ जोडलेले आहे.**

---

ई-मेल द्वारे

पृ.क्र-विकाअ/लेखा/शासन परिपत्रक/२०१६-१७/ 380
सहसंचालक तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती.
दिनांक- 10 FEB 2017

प्रति,

प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती
प्राचार्य, शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, अमरावती
शासकीय तंत्रनिकेतन,
अमरावती/ मुर्तिजापूर/ खामगांव/ यवतमाळ/ वाशिम/ यवतमाळ (महिला)

प्र. सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
अमरावती.

D:\Vitta (Lekha 1)\LETTERS\Endorsment Letter\Govt. Resolutions.doc

तंत्रशिक्षण उपविभागाची विविध कार्यालये/शासकीय संस्था/शासन स्थापित स्वायत्त संस्था तसेच अधिनियमाव्दारे स्थापित मंडळे/प्राधिकरणे यांनी खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीच्या सुधारित नियमांचे पालन करण्याबाबत ...

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन परिपत्रक क्रमांक: तंशिख-१८१७/(प्र.क्र.२१/२०१७)/तांशि-३
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १ फेब्रुवारी, २०१७

संदर्भ : १) शासन निर्णय, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग क्र.भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, दि.१ डिसेंबर, २०१६
२) संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय यांचे क्र.११/डीटीई/परवानगी/२०१६-१७/११०८, दि.९ जानेवारी, २०१७

परिपत्रक :- शासन निर्णय, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग क्र.भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, दि.१ डिसेंबर, २०१६ अन्वये शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारीत नियम पुस्तिका लागू करण्यात आलेली आहे. हे नियम दि.१ डिसेंबर, २०१६ पासून लागू करण्यात आले आहेत. तथापि, तत्पूर्वी उद्योग ऊर्जा व कामगार विभागाच्या दि ३० ऑक्टोबर, २०१५ च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेल्या खरेदी धोरणांप्रमाणे वस्तू खरेदीसाठी निविदा प्रक्रीया सुरु केली असल्यास त्यापुरती मर्यादित पूर्वीच्या धोरणांप्रमाणेच खरेदी प्रक्रीया पूर्ण करता येणार आहे.

२. उद्योग ऊर्जा व कामगार विभागाच्या दि. १ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये लागू करण्यात आलेल्या खरेदी विषयक सुधारित नियम पुस्तिकेतील परिच्छेद क्र.२.४ मध्ये, नियम पुस्तिकेतील तरतूदी कोणकोणत्या कार्यालयांना लागू राहतील याबाबतचा उल्लेख करण्यात आलेला आहे. त्यामध्ये राज्य शासनाचा कोणताही विभाग किंवा त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालये, विधान सभेच्या कायद्याखाली स्थापित कोणतीही संस्था किंवा मंडळ किंवा महामंडळ किंवा प्राधिकरण किंवा सोसायटी किंवा न्यास किंवा स्वायत्त संस्था किंवा राज्य शासनाच्या मालकीची किंवा नियंत्रणाखाली असलेली कोणतीही संस्था इत्यादींचा समावेश आहे.

३. उद्योग ऊर्जा व कामगार विभागाच्या दि.१ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये सूचित केल्यानुसार खाली नमूद करण्यात आलेल्या सर्व कार्यालयांनी/शासकीय संस्थांनी/शासन स्थापित स्वायत्त संस्थांनी तसेच मंडळ /प्राधिकरणे यांनी उद्योग ऊर्जा व कामगार विभागाच्या दि.१ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयाव्दारे विहित केलेल्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीच्या सुधारित नियमांची अंमलबजावणी करावी.

१) तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई
२) सर्व विभागीय तंत्रशिक्षण कार्यालये
३) तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय संस्था
४) शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे
५) शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड

६) शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद
७) शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती
८) शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, चंद्रपूर
९) शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगाव
१०) महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ अधिनियम १९९७ खाली स्थापित महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ मुंबई
११) महाराष्ट्र विना अनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ (Maharashtra Unaided Private Professional Educational Institutions (Regulations of Admissions) Act, २०१५) अन्वये स्थापित शुल्क नियामक प्राधिकरण व प्रवेश नियामक प्राधिकरण.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(संजय औ. धारुरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
१) संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२) सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, शासकीय तंत्रनिकेतन, ४९ खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई.
३) सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, शासकीय तंत्रनिकेतन, ४९ खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई.
४) सह-संचालक, सर्व तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये (संचालक, तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत)
५) संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ मुंबई
६) तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय संस्था (संचालक, तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत)
७) संचालक, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे
८) संचालक, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड
९) संचालक, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद
१०) संचालक, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती
११) संचालक, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, चंद्रपूर
१२) संचालक, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगाव
१३) उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) कार्यासन (साशि-१) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रत, निवडनस्ती/तांशि-३